सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद

(शाखा महसूल)

**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, फाजलपूरा, औरंगाबाद**

दुरध्वनी 0240-2334501 ई-मेल : abdcoll@gmail.com

जा.क्र.2018/मशाका-2/पाणीटंचाई/प्र.क्र. दिनांक - ५ मे- 2019

## जाहिर ई- निविदा सूचना (2019-2020)

औरंगाबाद जिल्हयासाठी पाणी टंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाययोजने अंतर्गत गावे, वाडया, तांडे आणि नगरपालिका क्षेत्र (औरंगाबाद महानगरपालिका वगळून) येथे खाजगी टँकर/ ट्रकद्वारे पिण्याचा पाणीपुरवठा करावयाचा आहे. सदर कामासाठी खालील स्वाक्षरी करणार इच्छूक निविदाधारकाकडून ई- निविदा मार्गविण्यांत येत आहे.

| कामाचे नांव | ऑनलाईन निविदेची किंमत | बयानाची रक्कम | सुरक्षा ठेव | ई- निविदा विक्री/ डाऊनलोड करण्याचा दिनांक | ई-निविदा ऑनलाईन भरण्याचा दिनांक | लिफाफा क्र.1 मधील मूळ कागदपत्रे कार्यालयास दाखल करण्यांचा अंतिम दिनांक | ई- निविदा (लिफाफा क्र. 1) उघडण्याचा संभाव्य दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| औरंगाबाद जिल्हयातील गावे/वाडया तांडे व नगरपालिका क्षेत्रात टँकर/ट्रकद्वारे पिण्याचा पाणीपुरवठा करणे | **रु.25000 (पंचवीस हजार मात्र)** प्रतिनिविदा ऑनलाईन पध्दतीने ना-परतावा | **रु.1,13,06,000 (एक कोटी तेरा लाख सहा हजार मात्र)** मात्र (ऑनलाईन बँकिंग पध्दतीने ) किंवा ऑफ लाईन पध्दतीने | रु. 3,39,20,000 **(तीन कोटी एकोणचाळीस लाख वीस हजार मात्र )** | दि.6.5.2019 सकाळी 11.00 ते **20.5.2019** सायं 5.00 वाजेपर्यंत पंधरा दिवस | दि.6.5.2019 सकाळी 11.00 ते **20.5.2019** सायं 5.00 वाजेपर्यंत पंधरा दिवस | दिनांक **20.5.2019** रोजी सकाळी 10.00 ते 4.00 वाजेपयंत | **22.5.2019** रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद |

### अटी व शर्ती

1- कोणतीही ई- निविदा स्विकारणे अथवा सर्व ई- निविदा काहीही कारण न दाखविता रद्द करण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी राखून ठेवलेले आहेत.

2- ई- निविदेबाबत मा.न्यायालयात गेल्यास त्याची कार्यकक्षा ही औरंगाबाद जिल्हा असेल.

3- को-या ई - निविदा, सविस्तर अटी व शर्ती निविदा फॉर्म सोबत ऑन लाईन पध्दतीने वेबसाईट वर उपलब्ध राहतील फॉर्म फी रु. 25000/-(अक्षरी पंचवीस हजार मात्र) **(विना परतावा)** रक्कम www.mahatenders.gov.in वर ऑन लाईन पध्दतीने जमा करावी. निविदा खरेदी करिता धनादेश, धनाकर्ष अथवा पोस्टल ऑर्डर स्विकारण्यात येणार नाहीत. निविदा फॉर्म पोस्टाने विकले व स्विकारले जाणार नाहीत.

4- निविदा दर पत्रकासोबत दयावयाची बयाना रक्कम **रु. 1,13,06,000** (अक्षरी एक कोटी तेरा लाख सहा हजार ) www.mahatenders.gov.in वर ऑन लाईन बँकिंग पध्दतीने जमा करावी. ऑन लाईन रक्कम जमा करण्यास तांत्रिक अडचण उद्भवल्यास लिफाफा क्र.1 सोबत दिनांक 20.5.2019 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत राष्ट्रीयकृत बँकेचे कॉल/फिक्स डिपॉझिट मुळ प्रत (CDR/FDR) सोबत जोडावे.

(कृ.पु.पानावर..2..)

5- ज्या कंत्राटदारांना काळया यादीत घोषित केले असेल किंवा त्याबाबत कार्यवाही सुरु असेल त्यांनी किंवा त्यांचेशी संलग्न असलेले कंत्राटदारांनी निविदा भरु नयेत. अशा कंत्राटदारांनी ई- निविदा भरल्यास किंवा पुढील कालावधीत त्यांची सत्यता समोर आल्यास त्यांची ई- निविदा रद्द करण्यांत येईल.

6- जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद येथे उपस्थित कंत्राटदार/अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष ई- निविदा लिफाफा क्र.1 दिनांक **22.5.2019** रोजी सकाळी 11.00 वाजता अथवा निम्न स्वाक्षरीतांचे सोईनुसार ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील. ई- निविदा उघडण्याची तारीख व वेळ आवश्यक असल्यास बदलण्याबाबतचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेले आहेत.

7- निविदा दोन संच लिफाफे पध्दतीने भरावी लागेल.

8- पात्र निविदाधारकास लिफाफा क्र. 2 उघडणेची वेळ व दिनांक त्यांच्या ई-मेल पत्यावर कळविण्यात येईल.

9- प्रस्तुतची ई निविदा सूचना वेबसाईट http://aurangabad.nic.in वरही उपलब्ध आहे.

10- अधिक माहितीसाठी 180030702232, या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.

(उदय चौधरी)
**जिल्हाधिकारी औरंगाबाद**

सत्यमेव जयते
जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद
(शाखा महसूल)
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, फाजलपूरा, औरंगाबाद
दुरध्वनी 0240-2334501 ई-मेल : abdcoll@gmail.com

# खाजगी टँकर/ट्रकद्वारे पाणीपुरवठा करणेसाठी ई- निविदा सन 2019-20
## निविदा अटी व शर्ती

1. जिल्हाधिकारी औरंगाबाद हे सोबतच्या परिशिष्ठामध्ये दर्शविल्याप्रमाणे पाणीटंचाई निवारणार्थ करावयाच्या उपाययोजने अंतर्गत खाजगी टँकर्स/ट्रक्सद्वारे औरंगाबाद जिल्हयातील पाणीटंचाई भासणा-या गावासाठी/ शहरासाठी गट विकास अधिकारी व मुख्याधिकारी औरंगाबाद जिल्हा हे ठरवून देतील त्या अधिग्रहीत विहीर/कालवा व इतर स्त्रोतातून संबंधीत गावास पिण्याचे पाण्याचा पुरवठा करणे यासाठी जाहीर निविदा सुचनेत दर्शविलेल्या दिनांकापासून नियोजित वेळेपर्यंत पोहोचतील अशा ई-निविदा खाजगी टँकर/ट्रक धारकाकडून मागविण्यांत येत आहेत.
2. औरंगाबाद जिल्हयांतर्गत तालुक्यातील/ शहरातील पाणीटंचाई, पुरपरिस्थिती, इतर नैसर्गिक आपत्ती निर्माण झालेल्या भागात तहसिलदार/गट विकास अधिकारी यांचे अधिनस्त राहून खाजगी टँकर/ट्रकद्वारे पाणीपुरवठा करणे बंधनकारक राहील.
3. ई- निविदेसंबंधी सविस्तर अटी व शर्ती ऑनलाईन पध्दतीने वेबसाईट वर उपलब्ध राहतील. ऑनलाईन निविदा फी रु. 25,000/- (विना परतावा) रक्कम www.mahatenders.gov.in वर ऑनलाईन जमा करावी.
4. निविदेसोबत भरायची बयाना रक्कम रु. 1,13,06,000/- (एक कोटी तेरा लाख सहा हजार मात्र) ही www.mahatenders.gov.in वर ऑनलाईन जमा करावी. ऑन लाईन रक्कम जमा करण्यास तांत्रिक अडचण उद्भवल्यास लिफाफा क्र.1 सोबत दिनांक 20.5.2019 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत राष्ट्रीयकृत बँकेचे कॉल/फिक्स डिपॉझिट रिसिप्ट (CDR/FDR) सोबत जोडावे.
5. निविदेमध्ये भरण्यात आलेल्या दराची विधीग्राहयता संबंधीताचे करारपत्राचे दिनांकापासून एक वर्षापर्यंत बंधनकारक राहतील.
6. ई-निविदेत भरलेले दर हे पाणी वाहतुकिसह वाहनचालक, वाहनाची स्वच्छता, वाहनास लागणारे इंधन-वंगण, वाहनांची दुरुस्ती इ. तत्सम बाबीवरील सर्व खर्च विचारात घेवून ई निविदा भरावी.
7. खाजगी टँकर्स/ट्रक्सला इंधन-वंगण पुरविण्याची जबाबदारी पाणी वाहतुक ठेकेदाराची राहील. यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारे आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. तसेच करारनामा कालावधीत इंधनाचे दर वाढल्यास कोणत्याही प्रकारची दरवाढ मिळणार नाही.
8. खाजगी टँकर्स/ट्रक्स पुरवठा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी औरंगाबाद अथवा ते ज्या अधिका-यास प्राधिकृत करतील अशा अधिका-यांनी लेखी आदेश दिल्याच्या तारखेपासून 24 तासात पाणीपुरनवठयासाठी खाजगी टँकर/ट्रक संबंधीत गावास पोहचविणे आवश्यक आहे. अन्यथा प्रतिदिन रु.5000/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल. आवश्यकतेनुसार खाजगी टँकर्स/ट्रक्स लावणे अथवा बंद करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी व त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना राहतील.
9. जिल्हाधिकारी/ उपविभागीय अधिकारी, कार्यालयातून कामाचे ठिकाणचे आदेश प्राप्त झाल्यानंतर सदरील टँकर्स/ट्रक्स औरंगाबाद जिल्हयातील तालुका स्तरावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे अधिनस्त कार्यरत राहतील.

(कृ.मा.पहा...2..)

10. नियोजित टँकर्स/ ट्रक्सद्वारे पाणीपुरवठा काही कारणामुळे बंद झाल्यास त्यासाठी संबंधीतास 24 तासाचे आत पर्यायी व्यवस्था करुन द्यावी लागेल, अथवा प्रतिदिन रु. 5000/- याप्रमाणे सात दिवसापर्यंत दंड आकारण्यांत येईल व तद्नंतरही सदर दोष कायम राहील्यास, करार रद्द होवून सुरक्षा ठेव जप्त होईल.

11. आदेशात नमूद केलेल्या गाव/वाडी, तांडयास नमूद केलेल्या दिनांकापर्यंत पाणीपुरवठा करणे, बंद टँकरधारकावर बंधनकारक राहील. सदरील आदेशात कोणत्याही क्षणी बदल अधिकार हे जिल्हाधिकारी, औरंगाबाद/ उपविभागीय अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

12. ठेकेदाराने त्यांचे नांव/ पुर्ण पत्ता लिफाफा पत्रकात देणे आवश्यक आहे.

13. जे दरपत्रक कंपनीने सादर केले असले त्यावर सर्व भागीदानी किंवा जर कोणी भागीदार गैरहजर असेल तर ज्या व्यक्ती कायदेशिर मुखत्यार पत्रधारक असतील अशा व्यक्तींनी सहमती देणे आवश्यक आहे. तसेच भागीदारी संस्था यांची प्रमाणित प्रत सोबत जोडावे.

14. ई -निविदा भरणारी सहकारी संस्था असेल तर संस्था नोंदणी प्रमाणपत्र (उपविधी) बायलॉज सोबत जोडावे. तसेच संस्थेचे रोख भांडवल किती आहे याचा तपशिल जोडावा. सहकारी संस्थेने निविदा देतांना मागील दोन वर्षाचा लेखा परिक्षण तपासणी अहवाल निविदेसोबत जोडावा, ही कागदपत्रे लिफाफा क्र. 1 मध्ये ठेवण्यांत यावीत.

15. दरपत्रक परिशिष्ठ किंवा त्यास संलग्न प्रपत्र यामध्ये कोणत्याही प्रकारचे कमी व जास्त बदल, किंवा खाडाखोड असल्यास ई- निविदा स्वीकारली जाणार नाही.

16. पाणीपुरवठा काळात खाजगी टँकर्स/ट्रक्सने कोणत्याही प्रकारचे नुकसान केल्यास वा अपघात केल्यास/झाल्यास त्यास वाहनचालक/ पाणीपुरवठा ठेकेदार हे वैयक्तीकरित्या जबाबदार राहतील, याबाबत शासनाची कोणतीही जबाबादारी राहणार नाही. कामगार नुकसान भरपाई कायद्यातील तरतूदीप्रमाणे रक्कम मजूराना देणे बाबत पाणीपुरवठा ठेकेदाराची जबाबादारी राहील. तसेच खाजगी वाहनास झालेल्या अपघाताच्या सर्व खर्चाची जबाबदारीही ठेकेदारावर राहील.

17. निविदा मंजूर होणा-या कंत्राटदारास कोणत्याही उपकंत्राटदाराची नेमणूक करता येणार नाही.

18. टँकर्स/ ट्रक्सद्वारे पाणीपुरवठा निविदा कालावधीत ठेकेदाराने इतर कोणत्याही व्यक्ती/ संस्थेशी केलेला करार/ खाजगी व्यवहाराची संपुर्ण जबाबादारी पाणी वाहतुक ठेकेदाराची राहील.

19. ठेकेदाराने पाणीपुरवठयासाठी मागणीनुसार खाजगी टँकर्स/ट्रक्सचा पुरवठा वेळेवर करावा.

20. पाणीपुरवठयासाठी पुरविण्यात आलेले टँकर्स/ट्रक्सची क्षमता, मालकि हक्क इ, बाबतची तपासणी जिल्हाधिकारी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांचेकडून किंवा ते प्राधिकृत करतील अशा अधिका-यांकडून करण्यांत येईल.

21. पाणी पुरवठा कामी लावण्यांत आलेल्या सर्व टँकर्स/ट्रक्स किंवा कोणत्याही खाजगी वाहनाची, त्याने केलेल्या पाणी पुरवठयाच्या फे-याबाबत, त्याच्या उद्‌भवाबाबत किंवा इतर तत्सम माहितीसाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी किंवा या व्यतिरिक्त जिल्हाधिकारी वेळोवेळी प्राधिकृत करतील असे अधिकारी/कर्मचारी यांना तपासणीचे अधिकार राहतील.

22. जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर पाणी वाहतुक ठेकेदाराने पाणी पुरवठा न केल्यास अथवा पाणी पुरवठयाचे काम असमाधानकारक असल्याचे आढळून असल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास कंत्राटदारास दिलेले काम काढून घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील व पाणी पुरवठयासाठी दुस-या कंत्राटदाराकडून काम करुन घेतले जाईल व त्याकरिता मंजूर दरापेक्षाजास्त लागणा-या खर्चाची फरकाची रक्कम मूळ ठेकेदाराकडून जमीन महसूलाची थकबाकि म्हणून वसुल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.

23. ठेकेदारास निविदेच्या कालावधीत दररोज काम देणे बंधनकारक राहणार नाही. औरंगाबाद जिल्हयांत निर्माण होणा-या परिस्थितीनुसार काम देण्यांत आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना किंवा ते प्राधिकृत करतील अशा अधिकारी यांना राहील.

24. ई-निविदे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील व तो निर्णय अंतिम असेल.

(कृ.मा.पहा...3..)

25. प्राप्त ई-निविदेपैकि कोणतीही/कोणत्याही दराची निविदा स्विकृत करण्याचा व कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्योच अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत.
26. कोणतीही ई- निविदा पूर्णपणे किंवा त्या निविदेचा काही भाग स्विकारणे अगर नामंजूर करणे याबबातचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवलेला आहे.
27. जर दोन किंवा अधिक ठेकेदारांनी निविदामध्ये दिलेले दर सारखेच असतील तर जिल्हाधिकारी यांना प्राप्त निविदेपैकि कोणतीही एक ई-निविदा स्वीकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार राहील त्यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील.
28. निविदाधारकांनी भरलेले दर कमी करण्यासाठी जिल्हाधिकारी वाटाघाटीसाठी बोलवू शकतात.
29. निविदाधारकांनी निविदेत नमूद दरांचा तुलनात्मक अभ्यास करुन विविध प्रत्येक क्षमतेत सर्वात कमी प्रतिदिन व प्रति कि.मी. दर येणा-या दोन किंवा त्यापेक्षा अधिक निविदाधारकास जिल्हाधिकारी वाटाघाटीसाठी किंवा दर कमी करण्याची शक्यता आजमावून पाहणेसाठी बोलवू शकतील.
30. कंत्राटदारास भारतीय दंड संहितेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली असल्यास/ काळया यादीत घोषित केले असल्यास किंवा त्याबाबत कार्यवाही सुरु असल्यास अशा कंत्राटदारांनी स्वत: किंवा त्याचे नातेवाईकाचे नावाने निविदा भरु नये. अशा कंत्राटदारांना देण्यात आलेले कंत्राट रद्द करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.
31. जिल्हयाच्या ज्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करतांना पथकर भरावा लागतो, अशा ठिकाणी खाजगी टँकर्स/ट्रक्स धारकांनी पथकर भरणे बंधनकारक राहील.
32. ठेकेदाराने पाणीपुरवठयासाठी वापरण्यांत येणा-या टँकर्स/ट्रक्स वाहनाची नंबरसहित/क्षमतेसहीत यादी जोडणे आवश्यक राहील.
33. जिल्हयातील टंचाई परिस्थिती लक्षात घेता अशा परिस्थितीत जिल्हाधिकारी निविदाधारकांना कामासाठी मुदतवाढ देवू शकतात. मुदतवाढ मिळाल्यास काम करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.
34. टंचाई कालावधीमध्ये लावण्यात येणा-या टँकरवर GPS यंत्रणा बसविण्याबाबत तसेच सदर यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती टँकर वाहतुकदाराने स्वखर्चाने करुन घ्यावी. पाणीपुरवठा करणा-या टँकरवर जीपीएस प्रणाली बसविल्यानंतर जीपीएस प्रणालीवर ज्या टँकरच्या फे-यांची नोंद होईल त्याच फे-या देयकाकरिता अनुज्ञेय होतील. व ज्या पाणी पुरवठा करणा-या टँकरवर जीपीएस प्रणाली नसेल आणि टँकर वाहतुक धारकांनी टँकरच्या फे-या झ ाल्याचा दावा केल्यास अशा फे-या बनावट ठरतील. जीपीएस प्रणालीच्या वापरावर देखरेख व संनियंत्रण ठेवणेसाठी गट विकास पातळी नियंत्रण कक्ष ठेवावे.
35. टंचाईग्रस्त गावात पाणीपुरवठा सुरु करणेसाठी प्रत्यक्षात खाजगी टँकर तहसिलदार व गट विकास अधिकारी यांचेकडे रुजू होतात. त्यानुसार पाणीपुरवठा कामासाठी रूजू होणारे खाजगी टँकरचे कागदपत्रे तपासणी करण्याची जबाबदारी तहसिलदार/गट विकास अधिकारी यांची राहील .(उदा. टँकर क्षमता, फिटनेस सर्टीफिकेट, इन्शुरन्स सर्टीफिकेट, परमिट वैधता व इतर तत्सम बाबी)
36. निविदा एकपेक्षा जास्त ठेकेदारास विभागून मंजूर करण्यांत आल्यास प्रत्येक ठेकेदारास सुरक्षा ठेव म्हणून राष्ट्रीयकृत बँकेचे डिपॉझिट स्वतंत्रपणे देणे बंधनकारक राहील.
37. दर यासोबत ऑनलाईन पध्दतीत विहीत केलेल्या जोडलेल्या प्रपत्रातच भरुन द्यावे लागेल.
38. ठेकेदाराची निविदा मंजूर झालेनंतर तात्काळ शासन निर्णयानुसार देय असलेले मुद्रांक शुल्क भरुन करारनामा करुन द्यावा.
39. निविदाधारकास निविदा मंजूरी नंतर रु. 3,39,20,000/- (अक्षरी तीन कोटी एकोणचाळीस लाख बीस हजार मात्र ) सुरक्षा ठेव म्हणून राष्ट्रीयकृत बँकेची कॉल/फिक्स डिपॉझिट रिसिप्ट देणे बंधनकारक राहील.
40. खाजगी ठेकेदारांना अदाई करण्यात आलेल्या देयकातून जीएसटी, व्हॅट, सेल टॅक्स इ. कराबाबत शासनाचे धोरणानुसार कपात करण्यांत येईल.
41. निविदा उघडण्याची प्रक्रिया सुरु असतेवेळी एखादया निविदाधारकांने दाखल केलेली ई- निविदा काही कारणास्तव उघडण्यात येवू नये अशी विनंती अथवा लेखी अर्ज सादर केल्यास संबंधीत निविदाधारकाने निविदेसोबत जमा केलेले बयाना रक्कमेचे डिपॉझिट जप्त करण्यात येतील तसेच सदर निविदा अस्विकृत करुन कार्यालयात जमा करण्यांत येईल.
42. शासन निर्णय क्र. टंचाई 2018/ प्र.क्र.167/ पापु 14/ दिनांक 19 डिसेंबर 2018 नुसार खाजगी टँकर्स व ट्रक्स यांना द्यावयाचे दर सुधारीत करण्यात आले आहे. त्यानुसार टँकर/ट्रक्सला देण्यांत येणारे प्रतिदिन व प्रति कि.मी. भाडे 1 मे.टन एककाच्या प्रमाणात देण्यांत येतील. पाण्याचे मागणीप्रमाणेच तेवढया क्षमतेच्या टँकरने पाणीपुरवठा करण्यांत यावा. (उदा. एखादया गावाची/वाडीची पाण्याची मागणी 9000 लि. असेल आणि 10000 लि.क्षमतेच्या टँकरने पाणीपुरवठा केला असेल तर 9000 लि. क्षमतेप्रमाणेच देयक अदा करण्यात येईल.)

(कृ.मा.पहा...4..)

42. पुरविण्यांत येणा-या प्रत्येक वाहनाचे किलो मीटर दर्शविणारे मीटर चालू स्थितीत असावे त्या शिवाय वाहने स्विकारण्यात येणार नाही.

43. शासनाने पाणी पुरवठयासाठी टॅंकर्सची क्षमता व प्रतिदिन भाडे ठरवून दिलेले आहे. शासनाने ठरवून दिलेल्या क्षमतेनुसार टॅंकर्सद्वारे पाणी वाहुन नेले तर मंजूर होणा-या दराने भाडे देण्यात येईल. परंतू पाणी पुरवठयासाठी कंत्राटदाराने ट्रक्स पुरविल्या तर पुरविण्यात आलेल्या वाहनाद्वारे जितके लिटर पाणी प्रत्यक्षात वाहुन नेले जाईल त्या प्रमाणात वाहनांचे भाडे वितरीत केले जाईल. फक्त ट्रक्सच्या क्षमतेनुसार भाडे दिले जाणार नाही.

44. टंचाई कालावधीमध्ये लावण्यात येणा-या प्रत्येक टॅंकर/ट्रक्सवर GPS यंत्रणा बसविणे बंधनकारक राहील. तसेच त्याची देखभाल व दुरुस्ती संबंधीत टॅंकर वाहतुकदाराने स्व:खर्चाने करुन घेणे बंधनकारक राहील.

45. महाराष्ट्र शासन वित्त विभागाचे शासन परिपत्रक जीएसटी 2017/प्र.क्र.81/पराधान करण्याबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार निविदाधारकाने निविदेचे दर सादर करतांना G.S.T. च्या कराच्या बोझाचा विचार करुनच दर सादर करावेत. तसेच शासनाचे G.S.T. संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले व करण्यात येणारे नियम/ अटी व शर्ती तसेच दर लागु/बंधनकारक राहतील.

46. GPS आज्ञावली संबंधी सर्व तालुक्यांचे युजर आयडी व पासवर्ड पंचायत समिती कार्यालयाला उपलब्ध करुन द्यावेत. यामध्ये होणा-या बदलाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालय यांना वेळोवेळी अवगत करावे.

47. भविष्यातील पाणीटंचाई विचारात घेता आवश्यक तेवढे जी.पी.एस. सेट उपलब्ध ठेवणे बंधनकारक राहील.

48. GPS आज्ञावली बसविल्यानंतरच टॅंकरचा वापर करणे बंधनकारक राहील.

49. टॅंकरची क्षमता उपअभियंता पा.पु. उपविभाग यांचेमार्फत प्रमाणित केलेली असावी. टॅंकर बाबत परिवहन विभागाने निर्धारित केलेल्या सर्व प्रमाणपत्रे, त्याची तपासणी इ. बाबीची पुर्तता करण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

50. GPS आज्ञावली सुस्थितीत ठेवणे टॅंकर पुरवठा धारकाची जबाबदारी राहील. जी.पी.एस.सेट तांत्रिक कारणास्तव खराब झाल्यास 48 तासात दुरुस्त करुन घेणे बंधनकारक राहील.

52. GPS सॉफटवेअर तयार करणे बंधनकारक राहील.

53. GPSआज्ञावलीमध्ये Geo fencing करणे बंधनकारक राहील. वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालय/ जिल्हा परिषद कार्यालयाच्या सुचने बदल करणे बंधनकारक राहील.

54. पाणीपुरवठारांनी टॅंकर फे-यांचे अहवाल न बदलता येणा-या PDF स्वरुपात घ्यावेत. तसेच Excel, Word Format मध्ये सुध्दा देण्यांत यावे.

55. वाडी-वस्तीसाठी व लहान गावासाठी मागणीप्रमाणे कमी क्षमतेचे टॅंकर पुरवावे लागतील.

56. गावापासून पाणी भरण्याचे स्त्रोताचे अंतर (जाणे-येणे) 25 ते 30 कि.मी. पर्यंत असेल तर किमान 4 खेपा, 30 ते 50 कि.मी. पर्यंत असेल तर किमान 3 खेपा, 50- 100 कि.मी. पर्यंत असेल तर किमान 2 खेपा पूर्ण करणे आवश्यक राहील.

58. GPS आज्ञावलीत टॅंकर क्रमांक/ गावाचे नांव / टॅंकरची क्षमता/ मंजूर खेपा, नकाशे इ. बाबत नोंदी असणे आवश्यक आहे.

59. GPS आज्ञावलीत जुना डाटा Save करणेसाठी जास्तीची Storage capacity ठेवावी.

60. GPS आज्ञावलीची Utility पाहिल्यानंतर GPS आज्ञावली मंजूर केली जाईल.

61. प्रत्येक तालुक्यासाठी GPS आज्ञावली हाताळण्यासाठी आपले मार्फत 1 ऑपरेटर गट विकास अधिकारी कार्यालयाकडे उपलब्ध करुन देण्यांत यावा.

62. प्रत्येक 100 टॅंकरमध्ये 2 टॅंकर राखीव ठेवणे बंधनकारक राहील. राखीव टॅंकर ठेवण्याबाबत कोणताही मोबदला मिळणार नाही.

स्वाक्षरित /-

**(उदय चौधरी)**

**जिल्हाधिकारी औरंगाबाद**

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

## मे. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे समोर

<u>रु. 100 /- चे बॉन्ड पेपरवर</u>

## <u>ठेकेदाराने दयावयाचे बंधपत्र</u>

मी/ आम्ही --------------------------------------------- प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, वाहन, मनुष्यबळ व इंधनाबाबत स्थानिक अशी परिस्थिती मला/आम्हाला पूर्ण माहिती असून मी/आम्ही माझे/आमचे वाहनाचे वाहतूकिचा दर या परिस्थितीशी अनुसरुन देत आहे. याबाबतचा मी/आम्ही कामाच्या सर्व अटी व शर्तीचा काळजीपूर्वक अभ्यास केला असून मला/आम्हाला संपूर्ण काम समजले आहे. मा.जिल्हाधिकारी किंवा त्यांचे सहायक मान्य करीत अशी उत्कृष्ट दर्जाची सोय/ सेवा मी/ आम्ही प्रदान करण्याची प्रतिज्ञा करतो व त्यांनी दिलेले निर्णय मला/आम्हाला बंधनकारक असतील.

मी/ आम्ही प्रतिज्ञापत्र देतो की, मी/आमची निविदा स्विकृत करण्यात आल्यास टंचाई कालावधीत जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी यांचे मागणीनुसार व टंचाई परिस्थितीनुसार मागणीप्रमाणे खाजगी टँकर्स इंधनासह उपलब्ध करुन देण्यास मी/आम्ही बांधील राहू. तसेच निविदेतील अटी व शर्तीचा भंग केल्यास या निविदेतील अटी व शर्तीमध्ये दिलेल्या तपशिलानुसार मी/आम्ही दंडनिय कार्यवाहीस व झालेल्या नुकसानीची भरपाई करुन देणेस जबाबदार राहू.

निविदेतील सर्व अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

ठेकेदाराचे नांव,संपूर्ण पत्ता व स्वाक्षरी

दिनांक :-
ओळख देणा-याचे नांव :-
ओळख देणा-याची सही :-

## बंद टँकरद्वारे पाणीपुरवठा निविदा सन २०१९-२०२०

## वाहन तपशिला संबंधी विवरणपत्र

**निविदाधारकांचे नांव :-**

| अ.क्र. | टँकर क्रमांक | टॅक्स मुदत | सर्टीफिकेट ऑफ फिटनेस मुदत | इन्शूरन्स सर्टीफिकेट मुदत | Renewal of Permit मुदत | PUC | व्यवसायकर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| ८ | | | | | | | |
| ९ | | | | | | | |
| १० | | | | | | | |
| ११ | | | | | | | |
| १२ | | | | | | | |

तपासणी अधिकारी यांचा अभिप्राय/शेरा -

**लिफाफा क्रमांक :- 01**

1 निविदा फी रु.25,000/- व बयाना रक्कम रु. 1,13,06,000/- ऑनलाईन पध्दतीने भरल्याची पावती. ऑन लाईन बयाना रक्कम जमा करण्यास तांत्रिक अडचण उद्भवल्यास लिफाफा क्र.1 सोबत दिनांक 20.5.2019 रोजी सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत राष्ट्रीयकृत बँकेचे कॉल/फिक्स डिपॉझिट रिसिप्ट (CDR/FDR) सादर करावे.

2 निविदाधाकास कमीत कमी 1 वर्ष पाणीपुरवठा कामाचा अनुभव असणे जरुरी आहे. तसे संबंधीत जिल्हाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे प्रमाणपत्र.

3 भागीदारी संस्था असल्यास निबंधक भागीदारी संस्था यांची प्रमाणित प्रत. निविदा भरणारी संस्था सहकारी संस्था असल्यास संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्रं तसेच संस्थेकडे उपलब्ध खेळते भांडवल सबंधी संस्थेच्या बँक पासबुकाची साक्षांकित प्रत, संस्थेचा मागील तीन वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल.

4 निविदाधारकांकडे स्वत:चे मालकिचे कमीत कमी 12 खाजगी टँकर्स/ट्रक्स असावीत. स्वत:च्या मालकीचे असल्याबाबत पुरावा आर.सी. बुक साक्षांकित छायाप्रत जोडणे आवश्यक आहे. ई- निविदापत्रकामध्ये दिलेल्या विहीत नमुन्यात माहिती भरुन सादर करावी. निविदा मंजूर झाल्यानंतर पाणीपुरवठयासाठी वापरण्यांत येणा-या वाहनांचा क्रमांकाची यादी जोडावी. तसेच सदर वाहने इतर जिल्हयांत वापरात नसल्याबाबत प्रमाणपत्र जोडावे. वाहनाचे वाहन नोंदणी प्रमाणपत्राची प्रमाणित साक्षांकित प्रत.

5 अद्ययावत वाहनकर व वाहनांचा विमा भरल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत.

6 टँकर्स/ ट्रक्स सुस्थितीत असल्याचे आरटीओ चे प्रमाणपत्र (Fitness Certificate)

7 सक्षम अधिका-याचे आयकर नोंदणी प्रमाणपत्र (Income Tax Clearance Certificate ) अथवा निविदाधारक आयकरदाता असल्याबाबत पुरावा किंवा आयकर भरणा केल्याबाबतचे मागील तीन वर्षाचे विवरणपत्राची प्रत.

8 जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी/ तहसिलदार यांचे मागणीनुसार निविदाधारक खाजगी टँकर्स इंधनासह उपलब्ध करुन देण्यास तयार असल्याबाबत शंभर रुपयांचे बॉन्डपेपर तालुका दंडाधिकारी यांचे समोर केलेले बंधपत्र (ठेकेदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र)

9 निविदाधारक संस्था, प्रोप्रायटरशिप, पार्टनरशिप, प्रायवेट लिमिटेड, सहकारी संस्था इ. प्रकारात मोडत असेल त्याप्रमाणे संस्थेचे समक्ष अधिका-यांचे नोंदणी प्रमाणपत्र.

10 सर्व कागदपत्र साक्षांकित असावेत.

**लिफाफा क्रमांक :- 02**

निविदेसोबत देण्यात आलेल्या BOQ FILE मध्येच दर भरुन वेबसाईटवर अपलोड करावे.

स्वाक्षरित /-
**(उदय चौधरी)**
**जिल्हाधिकारी औरंगाबाद**